मुंबई तरुण भारत ■. सोमवार, दि.८ सप्टेंबर २००३

## ज्येष्ठपर्व

# वृद्धांचा आधार

# ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्र

वयाची साठी उलटली...नोकरीला रामराम...करण्यासारखे काही नाही... घरातील माणसांना अडचण... अशी परिस्थिती जवळजवळ सर्वच ज्येष्ठ नागरिकांची होऊन बसली आहे. एवढ्या प्रदीर्घ वर्षांच्या अनुभवाचा कुटुंबाला उपयोग होण्याऐवजी त्यांना घराबाहेर वेळ घालवावा लागतो. अशातच आधार मिळतो तो दी फॅमिली वेल्फेअर एजन्सी सारख्या संस्थेचा.

लोअर परळ येथील बी. डी. डी. चाळीच्या परिसरात गेली ५० वर्षे स्त्रिया, मुले व वृद्धांच्या कल्याणासाठी काम करणारी दी फॅमिली वेल्फेअर एजन्सी ही एक सेवाभावी संस्था आहे. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असून त्यांचे स्वरूप बदलत आहे. अशातच दी फॅमिली वेल्फेअर एजन्सी सारख्या संस्था मोलाची कामगिरी बजावताना दिसतात.



संस्थेबद्दल माहिती देताना संस्थेच्या समाज सेविका दिव्यानी आणि प्रेरणा कांबळे मुंबई तरुण भारतला सांगतात...ही संस्था धारावी येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्र चालवत आहे. या केंद्राची सुरुवात ७ जानेवारी,२००२ साली झाली. माटुंगा लेबर कॅम्प, टी जंक्शन, ट्रान्झीट कॅम्प, कुंभार वाडा, मुस्लीम नगर, शाहू नगर, माहिम रेल्वे स्थानक आणि माहिम फाटक या परिसरांचे सर्वेक्षण करूनच हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. या परिसरातील अनेक वृद्ध स्त्री-पुरूष आपला वेळ घालविण्यासाठी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत या केंद्रात येतात. या वृद्धांचे हे केंद्र एक विरंगुळ्याचे, प्रेमाचे ठिकाण बनले आहे.

केंद्रातर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी दर सोमवारी सकाळच्या सत्रात फक्त पुरुषांसाठी योगाचे वर्ग चालतात तर दुपारच्या सत्रात महिलांची बैठक घेण्यात येते.मंगळवारी पुरुषांची बैठक होते. या बैठकीत आरोग्य, धार्मिक, शैक्षणिक, मनोरंजन आदी विषयांवर मार्गदर्शन केले जाते. बुधवारी सायन रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टरांच्या मदतीने ज्येष्ठ नागरिकाची तपासणी केली जाते.त्याचंप्रमाणे गुरूवार व शुक्रवारी पुरुषांसाठी फिजिओथेरपीचे वर्ग चालतात. या थेरपीचा ज्येष्ठांवरती चांगलाच परिणाम होत असल्याचे जाणवते. मात्र शनिवारी हे केंद्र बंद ठेवण्यात येते.



या व्यतिरिक्त ज्येष्ठांसाठी इतर कार्यक्रम राबविले जातात. वयस्कर लोकांसाठी आरोग्य शिबीर भरवून सायन रुग्णालयातील डॉक्टर आजाराविषयी माहिती देतात. सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, अन्नपूर्णा योजना यांची माहिती देण्यात येते. ६० वर्षांवरील लोकांना डिग्नीटी कार्ड मिळवून देण्यात संस्थेचा हातभार लागत असतो. मधुमेह, रक्तदाब, न्युरोलॉजी सारख्या आजारांवर वैद्यकी य माहिती देण्यात येते तसेच बहिऱ्या लोकांना अलीयावर जंग रुग्णालयात नेऊन कानाचे यंत्र देण्यात येते.केंद्रात ज्येष्ठ नागरिकांच्या विचारांची देवाणघेवाण केली जाते. बाहेरील व्याख्याते बोलावून व्याख्याने ठेवण्यात येतात.प्रत्येक महिन्यात कार्यशाळा घेण्यात येतात. ज्येष्ठांच्या समस्या अडचणींवर उपाय काढण्यासाठी टॉक शो आयोजित केले जातात. ज्येष्ठाच्या रेशनिंगबाबतच्या समस्या, कौटुंबिक समस्या सुद्धा केंद्र हाताळत असते.ज्येष्ठांसाठी केंद्राने वाचनालयाची सोय केलेली आहे. मनोरंजनासाठी आणि एकलकोंडेपणा जाण्यासाठी या सभासदांसाठी सहलीचे प्रयोजन केले जाते.

काही ज्येष्ठ नागरिक खूप आजारी असतात. त्यांना घराच्या बाहेर पडता येत नाही. अशांसाठी केंद्रातर्फे लवकरच होम केअर सर्व्हिस नावाचा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे.या अंतर्गत अत्यंत आजारी व घरातील व्यक्तींकडून दुर्लक्ष होत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना त्याच्या घरी जावून सेवा देण्यात येणार आहे. त्यांच्यासाठी व्हीलचेअर, फिरत्या दवाखान्याची व्यवस्था केंद्रातर्फे करण्यात येणार आहे.

धारावी येथील ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्र सुरू करून एक वर्ष झाले आहे.या एका वर्षात संस्थेत सुमारे १०० वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक सभासद झालेले आहेत.हेच सभासद इतर नवीन सभासदांना घेवून येतात. केंद्र प्रवेशापासून वैद्यकीय उपचारांपर्यंत सर्व गोष्टी विनामूल्य पुरवत असते.या साठी अव्हेरी, शेर, स्नेहा यासारख्या सेवाभावी संस्थाची मदत केंद्राला होते. केंद्राची व्यवस्था सांभाळण्यासाठी दोन कर्मचारी ठेवण्यात आले आहेत.

केंद्रातील काही ज्येष्ठ नागरिकांशी बोलण्याचा मोह आवरता आला नाही. केंद्राविषयी भागवत जाधव सांगतात माझ्या घरच्यांना माझी अडचण नाही,परतु इथे आल्यावर इतरांच्या सुखदु:खात सहभागी होता येते, विचारांची देवाणघेवाण होते. नाथं कांबळे आपल्या समस्येविषयी सांगतात माणूस निवृत्त झाल्यावर त्याची घरच्यांना अडचण होते तिच गोष्ट माझ्या बाबतीत घडलेली आहे. त्यामुळे घराच्याबाहेर पडून कुठेतरी चकाट्या पिटत बसण्यापेक्षा केंद्रात काहीतरी वाचायला मिळते. साहेबराव बनसोडे यांना हृदयविकार आणि रक्तदाबाचा त्रास आहे. ते या केंद्रावर व्यायामासाठी येतात.अबकरी विभागातून निवृत्त झालेले जी. आर.करकटे यांना केंद्रातील विरंगुळा महत्त्वाचा वाटतो. वामन पद्माणे अपंग आहेत. केंद्रात येण्यापूर्वी त्यांना नीट चालता येत नव्हते. परंतु केंद्रात मिळत असलेल्या व्यायामामुळे ते आता सायकल चालवू लागले आहेत. एकनाथ सोहनी आपल्या इतर मित्रमंडळीशी गप्पागोष्टी करायला आणि बुद्धीबळ खेळायला येतात.

घरच्यांच्या होणाऱ्या त्रासाला कंटाळून ज्येष्ठांना घराबाहेर पडावे लागत असते. त्यांच्या गाठीशी असलेल्या प्रदीर्घ अनुभवाचा योग्य तो वापर करता आला पाहिजे. त्यादृष्टीने फॅमिली वेल्फेअर एजन्सी ने उचललेले पाऊल उल्लेखनीय आहे. पत्ता: ज्येष्ठ नागरिक सेवा केंद्र, दी फॅमिली वेल्फेअर एजन्सी, नागरी आरोग्य केंद्र, लोकमान्य टिळक रुग्णालय, खोली क्र.३०९, शाहू नगर, धारावी. वेळ- सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत.

-दीपक मांजरेकर